महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

शासकीय व महापालिकांच्या रुग्णालयात सर्प दंशावरील औषध मिळत नसल्याबाबत

(१) १९९५ (२२-१२-२०१४). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय व महापालिकांच्या एकाही रुग्णालयात सर्प दंशावरील औषध मिळत नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्प दंशावरील औषध शेडयुल ड्रग्जवर घेण्यात यावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

आरोग्य सेवा संचालनालयाच्या पुरवठा आदेशानुसार मे. हाफकीन जीवऔषध निर्माण महामंडळ, मुंबई यांचेकडून दरमहा ३०,००० व्हायल्स सर्पदंश लसींचा पुरवठा आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांना करण्यात येतो.

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता सर्वदंशावरील औषध खरेदीसाठी सन २०१४-१६ करीता मागविण्यात आलेल्या निविदांना प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे सदर औषधांची स्थानिक पातळीवर खरेदी करण्याबाबत सर्व रुग्णालयांना सूचना देण्यात आल्या असून त्यानुसार सदर औषध स्थानिक पातळीवर खरेदी करुन रुग्णांना पुरविण्यात येत आहे.

(२) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० च त्याअंतर्गत नियम १९४५ मधील "शेड्युल सी-Biological and Special products" अंतर्गत अशा स्वरुपाच्या औषधी लसींचा आधिपासूनच समावेश आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आमगाव तालुक्यातील (जि.गोंदिया) देवरी, सालेपा येथील अनेक सिंचन प्रकल्प अपुर्णावस्थेत असल्याबाबत

(२) ४२०१ (२३-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव तालुक्यातील (जि.गोंदिया) देवरी, सालेपा येथील अनेक सिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्याघ प्रकल्प देवरी कालव्यांचा योग्य दुरुस्ती नसल्याने शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक प्रकल्प नादुरुस्त असल्याने शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय.

(२) व (३) नाही.

बाघ प्रकल्पाच्या कालवे वितरण प्रणालीद्वारे खरीप व उन्हाळी हंगामात लाभधारकांच्या मागणीनुसार पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहचत आहे. तसेच आमगाव, देवरी व सालेकसा तालुक्यात पुर्ण झालेले १० प्रकल्प आहेत. या प्रकल्पांद्वारे दरवर्षी सुरळीत सिंचन करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी परिसरातील कामगार हॉस्पीटलमध्ये आवश्यक सोयीसुविधा आणि औषधोपचार रुग्णाना मिळत नसल्याबाबत

(३) ५७२५ (०८-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी परिसरातील कामगार हॉस्पीटलमध्ये आवश्यक सोयीसुविधा आणि योग्य औषधोपचारही सर्वसामान्य रुग्णांना मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामगार रुग्णालयाची दुरवस्था सुधारण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप याबाबत उपाययोजना करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (११-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

राकांवि महामंडळ आदर्श रुग्णालय अंधेरी हे रुग्णालय फक्त अधिकृत राकावि महामंडळ कार्डधारक व त्यांचे अवलंबित यांच्याकरिता आहे. तथापि राकावि महामंडळ कार्डधारक नसलेल्यांना आपत्कालीन स्थितीत रुग्णालयात आणल्यास त्यांना सुध्दा विनामुल्य प्राथमिक उपचार देऊन त्या स्थितीत स्थैर्यता आणल्यानंतर व समुप्रदेशनानंतर त्यांना इतर महानगरपालिका अथवा सामान्य रुग्णालयात पुढील उपचाराकरिता पाठविण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) राकावि महामंडळ आदर्श रुग्णालय अंधेरी हे रुग्णालय केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालय यांच्या अधिपत्याखालील राकावि महामंडळ नवी दिल्ली यांच्या अखत्यारित असून सदर रुग्णालयाच्या सर्व कामकाजावर राकावि महामंडळ नवी दिल्ली यांचे नियंत्रण आहे. ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.

वाडा (जि.पालघर) तालुक्यात कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेच्या कामात दुर्लक्ष झाल्याबाबत

(४) ६९३५ (०७-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढती लोकसंख्या रोखण्यासाठी शासन विविध योजना राबवित असतांना व त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करीत असतांना वाडा तालुक्यात ६८४ कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेचे उद्दीष्ट असतांना केवळ ११६ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असल्याची बाब ११ जानेवारी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्दीष्ट गाठण्याच्यादृष्टीने उर्वरित शस्त्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावरुन काय उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे व त्यानुसार किती कालावधीत उद्दिष्ट पार पाडणे अपेक्षित आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

सन २०१४-१५ मध्ये वाडा तालुक्यात एकूण कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे वार्षिक उद्दिष्ट ८५५ इतके होते. त्यापैकी माहे जानेवारी २०१५ पर्यंत ७१३ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याच्या अपेक्षित उद्दिष्टांपैकी ४८३ (६८ टक्के) इतक्या शस्त्रक्रीया करण्यात आल्या आहेत. मार्च २०१५ अखेर ३७६(७९ टक्के) इतक्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(२) कुटुंब नियोजन शस्त्रक्रीयेचे विहित उद्दिष्ट १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अपेक्षीत आहे. सदर कालावधीत विहित उद्दिष्ट गाठण्याकरीता वाडा तालुक्यात पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट तालुक्यातील सर्व ४ प्राथमिक आरोग्य केंद्राना त्यांच्या लोकसंख्येनुसार विभागून देण्यात आले. तसेच उद्दिष्ट पूर्ततेसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पंधरवडा व मासिक आढावा बैठक प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर घेण्यात आल्या आहेत.
२. वैद्यकीय अधिकारी यांच्या तालुका व जिल्हास्तरावर बैठका घेऊन उद्दिष्ट पूर्ततेचे नियोजन करण्यात आले. यामध्ये शस्त्रक्रिया शिबिराचा कृती आराखडा तयार करणे, प्रशिक्षित सर्जनची नियुक्ती करणे अशा बाबींचा समावेश होतो.
३. लाभार्थींना शस्त्रक्रिया करुन घेणे सोईचे व्हावे म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्रासह निंबवली आरोग्य पथक येथील शस्त्रक्रिया गृह दुरुस्ती करुन ते सुरु करण्यात आले.
४. तालुक्यात २ खाजगी रुग्णालयांचे कुटुंब कल्याण शस्त्रक्रियांकरीता नामांकन करण्यात आलेले आहे.
५. लाभार्थी, प्रवर्तक व सर्जन यांना देय मोबदला देण्याची व्यवस्था प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयातील गैरसोयीबाबत

(५) ८०२१ (०८-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयात अपु-या डॉक्टरांमुळे याठिकाणी उपचारासाठी येणा-या रुग्णांना अनेक गैरसोयींना तोंड दयावे लागत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक डॉक्टर रुग्णालयात कार्यरत असल्यामुळे रुग्णांना त्रास सहन करावा लागत असून डॉक्टरांवरही ताण पडत आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच वॉर्डमधील साफसफाईकडे दुर्लक्ष होत असल्याने वॉर्डमध्ये विचित्र वास येऊन दुर्गंधी पसरल्याने रुग्णांना त्यांचा त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रुग्णालयांची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार, पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग येथे मंजूर आकृतीबंधानुसार वैद्यकीय अधीक्षकांचे व पद मंजूर आहे. सदर पद रिक्त आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३ पदे मंजुर असून २ पद भरलेली व १ पद रिक्त आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, दोडामार्ग येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांची २ पदे भरलेली असल्यामुळे त्यांचेवर रुग्णालयीन व प्रशासकीय कामाचा ताण येतो ही वस्तुस्थिती आहे, राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमातील बी.ए.एम.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांना मदतीला घेतले जाते.

(३) हे खरे नाही.

जिल्हा शल्य चिकित्सकांकडून ग्रामीण रुग्णालयांची तपासणी नियमित करण्यात येते. त्यावेळी अस्वच्छता असल्याचे आढळले नाही. रुग्णालयीन स्वच्छतेचे कामकाज वेळापत्रकाप्रमाणे केले जाते.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रुग्णालयांत आयव्हीएफ सेंटर सुरु करण्याबाबत

(६) ८२०६ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलत्या जीवनशैलीमुळे बंध्यत्वाचे प्रमाण वाढत असल्याने गाव-खेडयातील लोकांची फसवणूक मोठया प्रमाणात होत असल्याने ही फसवणूक थांबविण्यासाठी रुग्णालयांत आयव्हीएफ सेंटरची आवश्यकता असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील रुग्णालयांत आयव्हीएफ सेंटर सुरु करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, किती कालावधीत हे सेंटर सर्व रुग्णालयांत सुरु करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील किनवट व हिमायतनगर तालुक्यांना मृदसंधारण कामांकरीता अतिरिक्त निधी वितरीत करण्यात आल्याबाबत

(७) १०४५२ (०७-०४-२०१५). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील किनवट व हिमायतनगर तालुक्यांना सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात २७०२ या उपशिर्षाखाली आदिवासी विभागातून मृदसंधारण कामांकरीता अतिरिक्त निधी वितरीत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील अतिरिक्त निधीची आवश्यकता होती का तसेच सदर निधीत अपहार झाल्याने संबंधीत अधिकारी निलंबित करण्यात आले आहेत काय,
(३) त्यानुसार आत्तापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

तथापि आदिवासी विभागातून मृदसंधारण कामांकरिता अतिरिक्त निधी हा २७०२ या लेखाशिर्षाखाली वितरित करण्यात आला नसून तो लेखाशिर्ष ४४०२-१०१२ टिएसपी व ४४०२-१२०१ ओटीएसपी अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील किनवट व हिमायतनगर तालुक्यांना वितरित करण्यात आलेला आहे.
(२) संचालक मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांनी अतिरिक्त निधीची मागणी केली होती. स्थानिक तक्रारीच्या अनुषंगाने किनवट व हिमायतनगर तालुक्यातील सन २०१२-१३ मधील मृदसंधारण कामाचे अधिक्षक कृषी अधिकारी (दक्षता पथक), कृषी आयुक्तालय, पुणे यांनी चौकशी केली आहे. प्राथमिक चौकशीअंती दोषी आढळलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशायकिय कार्यवाही प्रस्तावित असून विभागीय कृषी सहसंचालक, लातूर यांनी कृषी पर्यवेक्षक श्री. व्हि.एस.राठोड यांना शासन सेवेतून निलंबित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यातील अनेर नदीवरील वैजापूर, सगासेन, उमर्टी, कर्जाणे व मेलाणे पाटबंधारेबाबत

(८) ११७६५ (०८-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील अनेर नदीवर वैजापूर, सगासेन, उमर्टी, कर्जाणे, मेलाणे इ. पाटबंधारे ब-याच वर्षापासून मंजूर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्यामध्ये काही अंशी वन जमिनी जास्त असल्याने अंदाजपत्रात निव्वळ वर्तमान मुल्यांचा समावेश केल्यास सदर बंधारे मापदंडात बसत नाही म्हणून निविदा रद्द केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बंधारे हे पूर्णपणे आदिवासी भागात येत असल्यामुळे या भागातील आदिवासी बांधकांमध्ये असंतोष आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर संबधित सर्व विभागांची बैठक घेऊन या बंधा-याबाबत तात्काळ निर्णय घेणेबाबत शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(५) असल्यास, या संदर्भात केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) व (२) होय, त्यापैकी कर्जाणे व मेलाणे उपसा सिंचन व देव्हारी को.प.बंधारा या योजना पूर्ण झालेल्या आहेत. ज्या योजनांमध्ये वनजमिनीचा समावेश आहे. त्या योजनांच्या निविदा रद्द झालेल्या आहेत.

(३) होय, अंशत: खरे आहे.
(४) व (५) सदर योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी या योजनांचे नक्त मालमत्ता मुल्यासाठीचे प्रस्ताव मा. मुख्य अभियंता, पुणे यांचे पत्रानुसार सादर करण्यात आलेले आहेत.

सांगली जिल्हयामध्ये वैद्यकीय अधिका-यांच्या जागा रिक्त असल्याबाबत

(९) १५२४९ (१४-०५-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये वैद्यकीय अधिका-यांच्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका वैद्यकीय अधिकाऱ्यांस ३-३ दवाखान्याचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एका वैद्यकीय अधिका-याला अतिरिक्त प्रभार दिल्याने लोकांचे हाल होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वैद्यकीय अधिका-याच्या रिक्त जागा भरणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्हयातील आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वरिष्ठ) संवर्गाची २५ पदे मंजूर असून त्यापैकी १४ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत. तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाचर १७१ पदे मंजूर असून सदर पदांवर १३२ स्थायी १० बंधपत्रीत १२ अस्थायी वैद्कीय अधिकारी कार्यरत आहेत व १७ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत अशा रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि, एका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे एकापेक्षा जास्त प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येत नाही.
(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वरिष्ठ) संवर्गाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा बट - अ संवर्गातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. सदर जाहिरातीनुसार प्राप्त उमेदवारांमधून २३७ जाहिरातीनुसार प्राप्त उमेदवारांमधून २३७ विशेषज्ञ व ४६६ एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

गर्भलिंग निदान व परिरक्षण प्रतिबंधक कायद्याअंतर्गत सोनोग्राफी सेंटरमधील डॉक्टरांना त्रास दिला जात असल्याबाबत

(१०) १६५३७ (१४-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेकायदा गर्भलिंग निदान रोखण्यासाठी गर्भलिंग निदान व परिरक्षण प्रतिबंधक कायद्याअंतर्गत प्रत्येक सोनोग्राफी सेंटरसाठी कडक नियम व अटी लागू केल्या आहेत पण या नियमांचा आधार घेत सोनोग्राफी सेंटरमधील डॉक्टरांना खूप त्रास दिला जात असल्याचा आरोप इंडियन सोनोलॉजिस्ट ॲण्ड गायनॅकॉलॉजिस्ट असोसिएशनने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सोनॉलॉजिस्ट व गायनॅकॉलॉजिस्ट यांनी या विरुध्द दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी आझाद मैदानावर जाहिर सभा घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोनॉलॉजिस्ट व गायनॅकॉलॉजिस्ट असोसिएशनने केलेल्या उक्त मागणीबाबत राज्यशासनाने आपली भूमिका स्पष्ट करून याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, केलेल्या कार्यवाहीचा तपशील काय,

(५) अद्याप उक्त प्रश्नाबाबत राज्य शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) व (४) सर्व समुचित प्राधिकारी यांनी सर्व ठिकाणी कायद्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी सोनोग्राफी केंद्र धारक व समुचित प्राधिकारी यांना काय करावे व काय करुन नये याबाबत कळविले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्या बैठकीत आणि व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सोनोग्राफी व वैद्यकीय गर्भपात केंद्रांच्या तपासणीवेळी केंद्र धारकांना नाहक त्रास न देण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सुरक्षित मातृत्वासाठी राज्य शासनाच्या विविध योजना असूनही बाळंतपणात दरवर्षी १४०० मातांचा मृत्यू होत असल्याबाबत

(११) १६८५४ (१४-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरक्षित मातृत्वासाठी राज्य शासनाच्या विविध योजना आहेत, तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु आहे परंतु राज्यातील दुर्गम भाग, तांडे, आदिवासी पाडे तसेच झोपडपट्यामध्ये दळणवळणाचे साधने नसल्याने घरी होणा-या प्रसूतीचे प्रमाण १२ टक्के आहे. याशिवाय बाळंतपणात दरवर्षी १४०० मातांचा मृत्यू होत असल्याचे आरोग्य विभागाचे आकडेवारी सांगत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरीच होणारी प्रसूती तसेच प्रसूती दरम्यान होणारे माता मृत्यू टाळण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :(१) होय.

राज्यामध्ये सन २०१४-१५ या वर्षामध्ये घरी प्रसुती होण्याचे प्रमाण २ टक्के तसेच माता मृत्यूची संख्या १४४६ इतकी आहे.

(२) घरी होणाऱ्या प्रसुतीचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनामार्फत जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा योजना हे कार्यक्रम राबविले जातात.

जननी सुरक्षा योजने अंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील प्रवर्गातील गर्भवती लाभार्थींना शासकीय अथवा शासन मानांकीत संख्येत प्रसुती अथवा सिझेरियन शस्त्रक्रिया झाल्यास आर्थिक लाभ देण्यात येतो. तसेच जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर मातेस तिच्या निवास स्थानापासून ते शासकीय आरोग्य संस्थेपर्यंत ये-जा करण्याकरीता मोफत शासकीय वाहन उपलब्ध करुन दिले जाते. शासकीय आरोग्य संस्थेत प्रसूतीनंतर साधारण प्रसुती झालेल्या मातेस ३ दिवस व सिझेरियन प्रसुती झालेल्या मातेस ७ दिवस मोफत आहार दिली जातो. मोफत प्रसुती व सिझेरियन सेक्शन, मोफत आहार, मोफत प्रयोगशाळा तपासण्या आणि मोफत ओषधोपचार व गरजेनुसार रक्तपुरवठा पुरविला जातो.

तसेच प्रसुती दरम्यान होणाऱ्या माता मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर माता नोंदणी, लोहयुक्त गोळ्या वाटप, मातांना धनुर्वात प्रतीबंधक लसीकरण, जोखमीच्या अवस्थेबाबत तपासणी व समुदपदेशन, तज्ञांकडून तपासणी, तीव्र रक्तक्षयासाठी शिरेतून इंजेक्शन आयर्न सुकरोज, नवसंजीवनी योजनेंतर्गत आदिवासी जिल्ह्यात मातृत्व अनुदान योजनेंतर्गत आर्थिक लाभ दिला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात जेष्ठ डॉक्टरांना सेवेत कायम करताना मूळ वेतनावर काम करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिल्याबाबत.

(१२) १६८८७ (१४-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात गेली १५ ते २० वर्षे काम करणा-या हंगामी जेष्ठ डॉक्टरांना सेवेत कायम करताना मूळ वेतनावर काम सुरु करण्याचे आदेश आरोग्य विभागाने माहे एप्रिल, २०१५ दरम्यान काढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या डॉक्टरांन सेवा जेष्ठता वेतन, सेवानिवृत्ती लाभ, रजा तसेच पदोन्नती देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :(१) व (२) होय, समावेशनाचे आदेश निघाल्याच्या दिनांकापासून नियमित सेवेचे लाभ संबंधितांना लागू होतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयातील यंत्रसामुग्रीचा अभावासह अनुभवी डॉक्टर नसल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय

(१३) १६९३० (१४-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धर्माबाद (ता.जि.नांदेड) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयातील यंत्रसामुग्रीचा अभाव, अनुभव डॉक्टर नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरिल ग्रामीण रुग्णालयाची इमारती ही दहा वर्षापूर्वी वनविभागाच्या जागेत बांधण्यात आली असून या ग्रामीण रुग्णालयात सोयी सुविधा कमतरता तसेच कमी अनुभवी डॉक्टरांमध्ये डॉक्टरांमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :(१) धर्माबाद, जि. नांदेड येथे ३० खाटाच्या रुग्णालयाकरीता आवश्यक असलेली यंत्र सामुग्री उपलब्ध आहे. येथील वैद्यकीय अधिक्षकाचे १ मंजूर पद भरलेले असून वैद्यकीय अधिकारी, गट-अ च्या ३ मंजूर पदांपैकी दि. १.०५.२०१५ रोजी रिक्त झालेले पद दि. २१.०५.२०१५ रोजी भरण्यात आले आहे. त्यामुळे रुग्णांची कोणतीही गैरसोय झाल्याचे दिसून येत नाही.
(२) सदर ग्रामीण रुग्णालयाची इमारत वन खात्याच्या राखीव ०.००९७ आर जागेत बांधण्यात आलेली आहे. तथापि या रुग्णालयात सोयी सुविधेची कमतरता किंवा अनुभवी डॉक्टरांअभावी रुग्णांची गैरसोय झाल्याचे दिसून येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे अवयव दान करणाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत

(१४) १७०२९ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे अवयवदानातून नवीन आयुष्य देण्याची किमया डॉक्टरांनी साधली असली तरी अवयवदानाबाबत समाजात पुरेशी जनजागृती नसल्यामुळे, गैरसमजुतीमुळे अवयव प्रत्यारोपणाचा वेग फारसा वाढलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) यावर्षी मुंबईत १९ जणांनी देहदान केले असून, त्यामुळे ३२ मुत्रपिंड रोपण, १६ यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्यागेल्या परंतु हृदयदान करणारे दाते न मिळाल्यामुळे अनेक लोकांना मृत्यू प्राप्त झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अवयव दानाची चळवळ तेज करुन, लोकांमध्ये जनजागृती करुन अवयवदान करणा-यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) राज्यामध्ये लाईव्ह अवयव प्रत्यारोपणापेक्षा कॅडेव्हर अवयव प्रत्यारोपणाचे प्रमाण कमी असल्याने त्यामध्ये वाढ व्हावी म्हणुन शासनाने दि. १३ सप्टेंबर, २०१२ रोजी एकुण ४(चार) शासन निर्णय निर्गमित केले असुन त्यानुसार पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१) मस्तीष्क स्तंभ मृत्यू घोषिक करणे व प्रमाणित करणे हे सर्व नोंदणीकृत रुग्णालयांना व राज्यातील इतर नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर रुग्णालयांनी ही बंधकारक करण्यात आलेले आहे.

२) मस्तीष्क मृत्यू घोषित करण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असुन त्यानुसार सर्व रुग्णालयांनी कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

३) राज्यातील शस्त्राक्रिया गृह व अतिदक्षता विभागाची सुविधा असलेल्या सर्व रुग्णालयांना नॉन ट्रान्सप्लांट ऑगर्न रिट्रायव्हल सेंटर म्हणुन नोंदणी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

४) नोंदणीकृत प्रत्यारोपण केंद्राकडून प्रत्यारोपण कार्यक्रमात पारदर्शकता असणे व त्याचे उत्तरदायित्व निश्चित करण्यात आले असून याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

५) कु. जुही पवार या विद्यार्थीनीस महाराष्ट्र शासनातर्फे अवयवदान जनजागृतीसाठी ब्रँड ॲबेसेडर म्हणुन घोषित केले आहे.

तसेच उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य माहिती व शिक्षण कार्यालय, पुणे व सर्व विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्रे यांच्यामार्फत पथनाटय, बॅनर्स, पोस्टर्स, जाहिराती, द रेडिओ जिंगल्स आणि चर्चासत्रांचे आयोजन करुन अवयवदानासंदर्भात समाजास जनजागृती करण्यात येते.

भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात, थंडी तापाच्या पेशंटला कुत्र्याच्या लसीचे इंजेक्शन देण्यात आल्याबाबत

(१५) १७०३८ (१७-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात, आरोग्य सेविकेने थंडी ताप आलेल्या रुग्णाला दिनांक ६ मे, २०१५ रोजी कुत्र्याच्या लसीचे इंजेक्शन देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, रुग्णास इंजेक्शन देण्याची जबाबदारी कोणाची आहे,

(४) याप्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी योग्य ती दक्षता घेतली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत (१४-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी डॉ.ए.पी. पाटील, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक ७/५/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे येथे जाऊन चौकशी केली आहे.

(३) रुग्णाल इंजेक्शन देण्याची जबाबदारी कार्यरत असणाऱ्या आरोग्य सेविकेची असते.

(४) हे खरे नाही.

(५) श्रीमती, वाय, के.शिंदे, आरोग्य सेविका यांना सदर प्रकरणात हलगर्जीपणा केल्याबाबत एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता तात्पुरती स्वरुपात रोखण्याची शास्ती केली आहे.

श्रीगोंदा, (ता.जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयात औषधांचा व इतर सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

(१६) १७३६९ (१४-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा, (ता.जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयात गेल्या तीन महिन्यापासून औषधांचा तुटवडा जाणवत असून इंजेक्शनसाठी लागणारी सुई, सलाईन बाटल्या क्ष किरण यंत्र असूनही क्ष किरण तंत्रज्ञाची मात्र नेमणूक न करणे, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची वारंवार जाणवणारी अनुपस्थिती इत्यादि गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरेश्या प्रमाणात मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१०-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथे औषधी व साहित्य सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

ग्रामीण रुग्णालय , श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथील मंजूर २७ पदांपैकी २० पदे भरलेली आहेत. सदर रुग्णालयातील क्ष-किरण तंत्रज्ञ हे पद रिक्त असले तरी जवळच्या ग्रामीण रुग्णालयातील क्ष-किरण तंत्रज्ञ यांना प्रतिनियुक्ती देवून ग्रामीण रुग्णालय, श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथील रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील रोटेगाव शिवारात सुरु असलेल्या जलयुक्त शिवार अभियांनांतर्गत नियम डावलून सिमेंट बंधा-याची कामे पूर्ण करण्यात आल्याबाबत

(१७) १८०८२ (१४-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) श्री.रणजित कांबळे, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.अब्दुल सत्तार, ॲड यशोमती ठाकूर: सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील रोटेगाव शिवारात सुरु असलेल्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नारंगी नदीवर जलसंधारण विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या सिमेंट बंधाऱ्यांच्या कामात जलसंधारण विभागाने अंदाजपत्रकाचे नियम डावलून सिमेंट बंधा-याची कामे पूर्ण करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तिन्ही बंधाऱ्यांच्या कामासाठी ४५ लाख रुपयांचा निधी लघुसिंचन (जलसंधारण) विभागास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या अभियंता व कर्मचारी यांचेवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

रोटेगाव येथील एकूण ३ सिमेंट बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यासाठी रु. ४५ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. उपरोक्त नमूद बंधाऱ्याची कामे प्रगतिपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जलयुक्त शिवार अभियांनाच्या कामांबाबत

(१८) १९२५१ (१७-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत राबवित असलेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या कामाचा प्रगती अहवाल वेळेत दाखल न केल्यामुळे राज्याच्या मृदसंधारण विभागाच्या संचालकानी विभागीय कृषी सहसंचालक पुणे, नाशिक, ठाणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर यांना दिनांक १६ मे, २०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियांनाच्या कामाचा पाठपुराव्या नंतरही माहिती सादर न केल्याने नोटीस बजावण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नोटीस दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत खुलासा सादर करणे आवश्यक असताना तो संबंधित विभागीय कृषी सहसंचालनकांनी सादर केला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनस्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) आयुक्त (कृषि) यांचे स्वाक्षरीने संबंधीतास सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात पाणी-टंचाईवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्याबाबत

(१९) २२४०२ (१४-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वासाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियानाअंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यात चालू असलेल्या कामात गाळ, माती व वाळू ओढया नाल्यातून काढून वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणा-या तांत्रिक मशीनचा दर साधारणतः कसा ठरविण्यात आला आहे,

(३) असल्यास, बांध-बंदिस्तीच्या १०० मीटरच्या कामाला साधारण किती पैसे दिले जातात,

(४) असल्यास, ओढ्यातील १००० घन मीटर गाळ काढायचा असेल तर त्याचे दर कसे ठरविण्यात आले,

(५) असल्यास, जिल्ह्यात आतापर्यत किती कामे करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय. हे खरे आहे.

(२) तांत्रिक मशिनचा दर जलसंपदा विभागाच्या समाईक दर सूचीनूसार ठरविण्यात आला आहे.

(३) जलसंपदा विभागाच्या सामाईक दर सूचीप्रमाणे बांध-बंदीस्तीच्या कामाकरिता हलक्या, मध्यम व भारी जमिनीनूसार प्रती १०० घन मीटर कामाकरीता रु. २८९४ ते रु. ४४३२ या दरम्यान रक्कम दिली जाते.

(४) नाला खोलीकरणासाठी प्रती घन मीटर खोदकामाचा दर अ-१ = २९.०० रुपये अ-२ = ३९.३० रुपये असा आहे.

प्रती घन मीटर उठाईचे दर २.५० मीटर ते ५ मीटरसाठी रक्कम रुपये ७.२० ते १२.०० या दरम्यान आहेत.

प्रत्यक्ष कामाच्या सर्वेक्षणानुसार आलेल्या परिणामास सदरील दर घेवून अंदाजपत्रक तयार करण्यात येते व १००० घ.मी. ओढ्यातील गाळ काढायचा असेल तर त्यासाठी सदरील दर वापरण्यात येतात.

(५) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये एकूण ७८७ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यामध्ये शासकीय मशिनरी मार्फत ४२ कामे, लोकसहभागातून २४४ कामे, शासकीय अनुदानातून ५०१ कामे इ. चा समावेश आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हा स्त्री रुग्णालयामध्ये एकाच स्त्री रुग्णाचे दोन वेगवेगळे रक्तगट दाखवल्याबाबत

(२०) २३१११ (१४-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा स्त्री रुग्णालयामध्ये एकाच स्त्री रुग्णाचे दोन वेगवेगळे रक्तगट दाखवल्याचे दिनांक २६ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयामध्ये गर्भवती महिलांवर मोठया प्रमाणात उपचार करण्यात येतात, अशा ठिकाणी असा प्रकार घडणे म्हणजे गंभीर बाब आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दुर्लक्ष करणाऱ्यांविरुद्ध काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

डॉ. दीपक सावंत (२९-०४-२०१६) :(१) हे खरे आहे.

दिनांक २६.०५.२०१५ रोजी एकाच स्त्री रुग्णाचे रक्तगट चुकून रक्तगटाच्या नोंदवहीत व ओ.पी.डी. कागदावर वेगवेगळे लिहिले गेले. सदर चुक तात्काळ दुरुस्त करण्यात येवून रक्तगट ए पॉझीटिव्ह ऐवजी ए निगेटिव्हि ओ.पी.डी. कागदावर लिहीण्यात आला.

(२) रुग्णांची गर्दी व मनुष्यबळाची कमतरता यामुळे अशी चुक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) होय.

(४) संबंधित कर्मचा-याचा खुलासा मागवून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती समज देण्यात आली आहे.

जामखेड (ता.अंबड, जि.जालना) येथे जलयुक्त शिवार अभियांनातर्गत धामवती नदीवर साखळी बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

(२१) २३८१५ (१४-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (ता.अंबड, जि.जालना) येथे जलयुक्त शिवार अभियांनातर्गत धामवती नदीवर साखळी बंधाऱ्याचे काम कृषी विभाग अंबड अंतर्गत चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुरु असलेले बंधाऱ्याचे काम अंदाजपत्रकानुसार न करता शासनाचे सर्व नियम डावलून करण्यात येत असून अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामात खडीऐवजी विहिरींच्या डबराचा व मातीमिश्रीत वाळूचा सर्रास वापर करुन कामे करण्यात येत असल्याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीनुसार शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे जामखेड ता. अंबड येथे साखळी सिमेंट नाला बांधाची ३ कामे ई-निविदा काढून करण्यात आली आहेत. तसेच कामाचा दर्जा योग्य राहण्यासाठी कॉक्रीट कोन दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळा औरंगाबाद यांच्याकडून तपासून घेतली असून ते योग्य दर्जाचे असल्याबाबत प्रमाणित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पुसद तालुक्यातील (जि.यवतमाळ) जलसंधारणाच्या कामात कोट्यवधी रुपयाचा गैरव्यवहार झाल्याबाबत

(२२) २४५८८ (१७-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद तालुक्यातील (जि.यवतमाळ) येथील गौळ शिवारासह बाळवाडी, शिळोणा, यलदारी परिसरात पाणलोट प्रकल्पाअंतर्गत नाला सरळीकरण, डहाळलेले बंधारे, दुरुस्ती करणे, पाणी अडविण्यासाठी सिमेंट बंधारे आदी कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे निकृष्ट पध्दतीने पुर्ण केली असून कामाच्या दर्जाचे मुल्यांकनही करण्यात आले नाही व संबंधित ठेकेदाराला देयकेही अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत स्थानिक परिसरातील नागरिकांनी जिल्हा कृषी अधिकारी, यवतमाळ यांचेकडे तक्रार देवुन अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

गतीमान पाणलोट विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१४-१५ अंतर्गत मृदसंधारणाची सिमेंट नाला बांध -३ व सिमेंट नाला बांध खोलीकरण-१, त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उप योजनेअंतर्गत (ओटीएसपी) ढाळीचे बांध बंदिस्तीची ४ कामे करण्यात आली आहेत. सदरची कामे ही योजनेच्या मार्गदशक सूचनेनुसार करण्यात आली असून तांत्रिक मापदंडानुसार खर्च करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नोंदणीकृत यंत्रधारकाकडून नियमावलीचा अवलंब करण्यात आलेला असून, झालेला कामाबाबतची देयके संबंधीत यंत्रधारकास अदा करण्यात आलेली आहेत. तसेच सदर कामाची तपासणी वेळोवेळी तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, उप विभागीय अधिकारी, महसूल, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी तसेच पदाधिकारी यांनी भेटी देवून कामाची पहाणी केलेली आहे.
(३) हे खरे नाही.

पाणलोट प्रकल्पाची कामे निकृष्ट झाल्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(२३) २४६३४ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी लघुसिंचन विभागाचे तीन अभियंते दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :(१) हे खरे आहे.

मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर येथील साखळी सिमेंट नाला बांध कामाची जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष कामाची तपासणी केली असून, सदर कामे निकृष्ट पध्दतीने झाली आहेत, असे निदर्शनास आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणाची चौकशी प्रलंबित असून सद्य:स्थितीत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तीनही अभियंत्यांना निलंबित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात एचआयव्ही प्रतिबंधासाठी शासनामार्फत देण्यात येणारे अनुदान गत सहा महिन्यांपासून मिळाले नसल्याबाबत

(२४) ३०६७९ (१६-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एचआयव्ही प्रतिबंधासाठी शासनामार्फत देण्यात येणारे अनुदान गत् सहा महिन्यांपासून मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदान तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्याक्रम हा १०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम आहे. केंद्र शासनाकडून जे अनुदान प्राप्त झाले आहे ते वेळोवेळी वितरीत करण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी तालुक्यातील नांदगाव बंधा-यांची दुरवस्था झाल्याबाबत

(२५) ३५५३७ (२०-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी तालुक्यातील (जि.परभणी) नांदगाव येथील दुधना नदीच्या पात्रात बंधारा बांधण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंधाऱ्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून निम्न दुधना प्रकरणातून सोडण्यात येणारे पाणी पूर्णपणे साठवण न होता ते खाली वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व यासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१६) :(१) होय हे खरे आहे.
(२) बंधाऱ्याचे गेट नादुरुस्त होते परंतु तेथे नविन ८८ गेट टाकून पाणी साठा केला आहे. दिनांक ८/२/२०१६ रोजी सोडलेले दुधना प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात अडविलेले आहे.
(३) गेट दुरुस्तीसाठी रुपये ६.७९ लक्ष निधी उपलब्ध झाला होता. त्यामधून ८८ गेट खरेदी केलेले आहेत व पाणी साठा केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे यलदरी (ता.पुसदर, जि.यवतमाळ) येथील जलसंधारणाच्या कामात लाखो रुपयाचा गैरव्यवहार झाल्याबाबत

(२६) ३६०२९ (१२-१-२०१६). श्री.मदन येरावार (यवतमाळ), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे यलदरी (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील परिसरात पाणलोट प्रकल्पा अंतर्गत नाला सरळीकरण, डहाळलेले बंधारे, दुरुस्ती करणे, पाणी अडविण्यासाठी सिमेंट बंधारे आदी कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे निकृष्ट पध्दतीने पुर्ण केली असून कामाच्या दर्जाचे मुल्याकंनही करण्यात आले नाही व संबंधित ठेकेदाराला बिलेही अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत स्थानिक परिसरातील नागरीकांनी जिल्हा कृषी अधिकारी, यवतमाळ यांचेकडे तक्रार देवुन अद्याप पर्यंत कुठल्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व कसे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
सदर कामे खात्याच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कण्यात आली आहेत.
(३) हे खरे नाही.

सदर कामाबाबत ग्रामस्थ व इतर कोणाचीही तक्रार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

स्टेट बँक ऑफ इंडिया कडून शेतक-यांना पिककर्ज देण्यास विलंब होत असल्याबाबत

(२७) ३६५०२ (१४-०१-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तिर्थपुरी (ता.घनसांवगी, जि.जालना) येथील स्टेट बँक ऑफ इंडिया ही शेतक-यांना पिककर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याने शेतक-यात असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत व्यवस्थापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१६) :(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

हदगाव (जि.नांदेड) येथे स्थलांतरीत ऊस तोड कामगारांची मुले कुपोषणाच्या विळख्यात असल्याबाबत

(२८) ३९९९१ (३०-०४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगाव (जि.नांदेड) येथील भाऊराव चव्हाण कारखान्याच्या युनिट चार मध्ये गेल्या दीड महिन्यापासून राज्यातील बीड, सोलापूर, नगर, उस्मानाबाद, लातूर आदि जिल्ह्यातून मोठ्या संख्येने उदरनिर्वाहासाठी आलेल्या ऊसतोड कामगाराच्या ० ते सहा वयोगटातील लहान मुलांची आरोग्याची तपासणी हदगाव गटशिक्षण कार्यालयाकडून माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तपासणीत ० ते ६ वयोगटातील तब्बल २०३ मुले पालकांची बेपर्वाई व एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या निष्काळजीपणामुळे या बालकांचे आरोग्य बाधीत होऊन कुपोषित सदृष्य जीवन जगत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या दीड-दोन महिन्यापासून ही मुले शासकीय सुविधापासून वंचित असून, स्थलांतरामुळे त्यांची उपेक्षा होत असून, ही लहान मुले एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंगणवाडी सेवेच्या लाभापासूनही वंचित आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय याबाबत अनभिज्ञ आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०२-०४-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हदगाव अंतर्गत ऊसतोड स्थलांतरीत कामगारांच्या ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचा गटशिक्षण व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प हदगाव या कार्यालयांकडून संयुक्त सेवा योजना प्रकल्प हदगाव या कार्यालयांकडून संयुक्त सर्वे करण्यात आला. सदर सर्वे मध्ये ० ते ६ वर्षाची २०३ मुले आढळून आली. या सर्व मुलांना अंगणवाडीचा आहार देण्यात आला. त्यांना पुर्व प्राथमिक शिक्षणाचा लाभ देण्यात आला. मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून सर्व बालकांचे लसीकरण करण्यात आले. तसेच गरोदर मातांची देखली तपासणी करण्यात आली आहे. सदर सर्वे मध्ये मध्यम कुपोषित (MAM) व तीव्र कुपोषित (SAM) ची बालके आढळून आली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

आंबर्डे (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील मंजूर असणारे धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(२९) ४१४०३ (०४-०३-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी तालुक्यातील सहा गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई असल्याने शासनाच्या पाटबंधारे विभागाकडून आंबर्डे (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे धरण मंजूर झालेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावे आंबर्डे नदीच्या तीरावर वसली असून सदर नदीला फक्त पावसाळ्यात पाणी असते त्यामुळे लोकांना तीव्र पाणी टंचाईची समस्या असून पिण्याचे पाणीही विकत घ्यावे लागते तसेच जनावरांचे अतोनात हाल होत असून जनावरे विकण्याची पाळी शेतकऱ्यांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मंजूर धरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०३-२०१६) :(१) होय.
लघु पाटबंधारे रणवेरवाडी (आंबर्डे) ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर या योजनेस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ३०/८/२०११ रोजी मान्यता प्रदान केली आहे.
(२) अंशतः खरे आहे.

(३) सदर प्रकल्पास स्थानिक शेतक-यांनी तीव्र विरोध करुन न्यायालयात दावा दाखल केला होता. त्याचा निकाल दिनांक २०/१२/२०१४ रोजी लागला असून भूसंपादनाचा निवाडा दिनांक ३०/७/२०१५ रोजी घोषित झाला आहे. निधी उपलब्धतेनुसार कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अस्थायी डॉक्टरांना शासनाने वैद्यकीय अधिकारी स्वरुपात पदस्थापना देण्याबाबत

(३०) ४१९०३ (११-०३-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी सेवा देण्यास तयार होत नसल्याने अस्थायी डॉक्टरांना शासनाने वैद्यकीय अधिकारी स्वरुपात पदस्थापना दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या १० वर्षापासून ७८९ अस्थायी डॉक्टर शासन सेवेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अस्थायी डॉक्टरांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे वा करित आहे,

(५) अद्यापि कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :(१) हे अंशत खरे आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून बाहेर काढुन स्वतंत्र निवड मंडळामार्फत करण्यात येते. वैद्यकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे सदर रिक्त पदे नियमित स्वरूपात भरेपर्यंतच्या कालावधीत सदर पदांवर बंधपत्रित व अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात येतात.

(२) हे खरे आहे. सदर ७८९ वैद्यकीय अधिकारी हे गट-ब संवर्गाचे आहेत.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) अस्थायी वैद्यकीय अधिकारी, गट-ब यांच्या समावेशनाबाबतच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून राज्यातील
नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याच्या निर्णयाबाबत

(३१) ४२४०१ (२९-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून राज्यातील नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०१५ च्या सुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) नदी / ओढा / नाला मधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे हि कामे लोकसहभागातून करुन नदी/ओढा/नाला पुनर्जीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशानी पुढाकार घेऊन लोकवर्गणी/ श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये घेण्यात आलेल्या नदी/ओढा/नाला पुनर्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून नदीपुर्जीवन कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर कार्यक्रम DPAP क्षेत्रात प्राधान्याने राबवायचा आहे. नदी/नाला/ओढ्यातील गाळ काढणे, खोलीकरण/रुंदीकरण वृक्ष लागवड, जनजागृती, पर्यवेक्षण इ. मध्ये लोकसहभाग आवश्यक, सिमेंट बंधाऱ्यांसाठी शासन स्तरावरुन निधी देण्यात येईल आणि दुरुस्ती, पाणलोट, वृक्षलागवड व इतर कामांसाठी अभिसरणाद्वारे निधी देणे आवश्यक, हा कार्यक्रम जलयुक्त शिवाराचा भाग असल्याने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व तालुका स्तरावर प्रांत अधिकारी यांच्या समितीमार्फत राबविण्यात येणार आहे.

(३) नदी पुनर्जीवन कार्यक्रमात नद्यांची निवड करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सादरीकरण करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत १६ जिल्ह्यातील १३९ नदी/नाल्यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून साखळी सिमेंट नाला बांधासाठी रु. १२२०३.३२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

कर्जत (ता.जि.रायगड) येथील पोही वनविभागाच्या लाकडे ठेवण्याच्या
डेपो मध्ये सुरक्षा व्यवस्था ठेवण्याबाबत

(३२) ४२७८७ (०७-०५-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (ता.जि.रायगड) येथील पोही वनविभागाच्या लाकडे ठेवण्याच्या डेपो मध्ये अन्य प्रकारच्या लाकडासह मौल्यवान समजले जाणारे सागवान आणि रक्तचंदनही साठा करुन ठेवण्यात आले असुन या डेपोजवळ कोणतीही सुरक्षा व्यवस्था तैनात ठेवण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाचे कर्जतमध्ये तीन भाग असुन या मध्ये वनविभागामध्ये जप्त करण्यात आलेली लाकडे लिलाव होईपर्यंत पोही डेपोत ठेवण्यात येत असुन त्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था नसल्याने ही लाकडे चोरीला जाण्याचा मोठा धोका आहे, हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :(१) सुरक्षा व्यवस्थेसाठी दिवसपाळीत व रात्रपाळीत वनजमजूर संरक्षणाचे काम करित आहेत. त्या व्यतिरिक्त कर्जत वनक्षेत्रातील वनपाल-१, वनरक्षक-२ व वनमजूर-१ असे ४ वनकर्मचारी दररोज आळीपाळीने रात्र गस्तीत संरक्षणाचे काम करीत आहेत. सध्या पोही विक्री आगारावर रक्तचंदन माल नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर तालुक्यात (जि.अहमदनगर) रानडुकरांनी रब्बी हंगामातील पिकांचे केलेले नुकसान

(३३) ४३७८८ (१४-०३-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर तालुक्यात (जि.अहमदनगर) रानडुकरांनी रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०३-२०१६) :(१), (२) व (३) अहमदनगर वन विभागातील अहमदनगर तालुक्यात माहे जुलै, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत रानडुक्करांनी शेत पिकांची नुकसानी केल्याची २३ प्रकरणे निदर्शनास आली आहेत. सदर प्रकरणात नुकसान झालेल्या क्षेत्राची तात्काळ पहाणी करण्यात आली असून प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी २३ प्रकरणात रू.६४,१५०/- अदा करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात होणाऱ्या बालमृत्यूचे प्रमाण मोजण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक केली असल्याबाबत

(३४) ४५६६७ (२३-०३-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, अमरावती, यवतमाळ तसेच ठाणे आणि नंदूरबार जिल्हयात बालमृत्यूमुळे सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील २४ तालुक्यात नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करून आठवडयातून एकदा बालमृत्यूची नोंद घेण्यास सांगीतले असल्याची माहिती दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोडल अधिकाऱ्यांनी आतापर्यंत किती बालमृत्यूची नोद घेतली असून त्या मागच्या कारणाची माहिती घेतली आहे काय, व त्याचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (३०-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

आरोग्य माहिती व्यवस्थापन पध्दतीच्या अहवालावरून राज्यातील सर्वात जास्त अर्भक मृत्युदर असलेल्या २४ तालुक्यांची निवड करण्यात आली असून त्यांचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक राज्यस्तरीय नोडल अधिकारी व एक सल्लागार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर नोडल अधिकाऱ्यांना या तालुक्यामधील बाल मृत्युचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी नियमित भेटी देण्याबाबत व संनियंत्रण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) नोडल अधिकाऱ्यांनी बालमृत्युच्या नोंदी घेणे अपेक्षित नसून नेमून दिलेल्या तालुक्यामधील बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जातील यासाठी मार्गदर्शन व सनियंत्रण करणे अपेक्षित आहे. अर्भक मृत्युदर कमी असणाऱ्या २४ तालुक्यात एप्रिल, २०१५ पासुन जानेवारी २०१६ अखेर ० ते १ वर्ष वयोगटातील ७८३ व १ ते ६ वर्ष वयोगटातील ३०७ बालमृत्युची नोंद झाली आहे. राज्यामध्ये होणारे नवजात अर्भक व बालमृत्यु, जन्मजात व्यंग, तीव्र श्वसनदाह, श्वासावरोध जन्मत: कमी वजन असणे, बाळ अपुऱ्या दिवसांचे असणे, जंतुसंसर्ग, अतिसार, न्युमोनिया या प्रमुख कारणांमुळे होतात.

(३) विलंब झालेला नाही.

श्री पिनाकेश्वर मंदिर (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील वन पर्यटन केंद्राचा प्रस्तावाबाबत

(३५) ४५७३७ (०७-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपवनसंरक्षक पूर्व भाग नाशिक (जि. नाशिक) या विभागाने श्री पिनाकेश्वर मंदिर (ता. नांदगाव, जि. नाशिक) येथिल वन पर्यटन केंद्राचा प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक नाशिक (प्रादेशिक)

या कार्यालयामार्फत मंजुरीसाठी व निधीच्या तरतुदीसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांच्या कार्यालयाकडे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी व त्यासुमारास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पिनाकेश्वर मंदिर, जातेगाव येथिल वन पर्यटन केंद्रास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी नांदगाव लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी व त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मा. मंत्री वने व प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांच्याकडे केलेली आहे, हे खरे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पिनाकेश्वर मंदिर ता.नांदगाव जि.नाशिक या वन पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी उपवनसंरक्षक पूर्व भाग नाशिक यांनी रु.२२५.०० लक्ष आराखडा तयार केला आहे. तथपि यामध्ये प्रस्तावित केलेल्या कामांना तांत्रिक तसेच प्रशासकीय मंजूरी नसल्यामुळे चालू आर्थिक वर्षामध्ये परीपुर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांना देण्यात आल्या आहेत.

अमरावती येथील चिखलदरा, धारणी आणि चांदूरबाजार या तीन तालुक्यातील कोल्हापूरी, साठवण, बंधाऱ्यांची कामे पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(३६) ४६९३८ (११-०३-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील जिल्हा परिषद सिंचन विभागाने जलयुक्त शिवार योजनेतून चिखलदरा, धारणी आणि चांदूरबाजार या तीन तालुक्यातील कोल्हापूरी, साठवण, बंधाऱ्यांची कामे मागील माहे जानेवारी महिन्यात निविदा काढून मंजूर केली असतानाही ही कामे केवळ पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी अभावी प्रलंबित असल्याचे जि.प. लघुसिंचन विभागात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदर कामे त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

तथापि, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यासाठी रु. ५०० लक्ष व लघु पाटबंधा-या कामांकरीता रु.४४० लक्ष असे एकूण ९४० लक्ष रूपयांचे २५५ कामांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेस पाठविले होते. २५५ प्रस्तावांपैकी ६७ कामे सिंचन विभागाची होती.

जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या ठराव क्र. ५ अन्वये जिल्हा परिषद मार्फत देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता रद्द करुन सदर कामे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे परत पाठविण्यात आली.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रस्तावित कामांना जिल्हाधिकारी, अमरावती यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांची निविदा कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अंबड (जि.जालना) परिसरात वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने दोन वर्षापूर्वी वृक्ष लागवड केलेल वनखात्याची जमीन पैसे घेऊन गुरे चारण्यासाठी खुली केल्याबाबत

(३७) ४७२७० (०७-०६-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने लाखो रुपये खर्च करुन वृक्षरोपणाची कामे यशस्वी हाताळत असतांना अंबड (जि.जालना) परिसरात वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने दोन वर्षापूर्वी वृक्ष लागवड केलेल वनखात्याची जमीन पैसे घेऊन गुरे चारण्यासाठी खुली केली असल्याची बाब नुकतीच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्ती शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :(१) अंबड (जि.जालना) परिसरात वृक्षलागवड केलेले वनक्षेत्र चराई साठी खुले करण्यात आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यातील १६७ कोल्हापूरी बंधाऱ्यावर बसविण्यात आलेल्या ५०९८ दरवाज्यांपैकी चोरीस गेलेल्या ९३५ दरवाज्यांच्या तपासाबाबत

(३८) ४७५८५ (०३-०३-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील १६७ कोल्हापूरी बंधाऱ्यावर बसविण्यात आलेल्या ५०९८ दरवाज्यांपैकी चोरीस गेलेल्या ९३५ दरवाज्यांचा तपास पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) अद्याप कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व पोलीस तपास केव्हां पूर्ण होणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

जालना लघु सिंचन (जलसंधारण) विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेल्या ३९ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे व जालना लघु पाटबंधारे (जिल्हा परिषद) विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेल्या १२८ बंधाऱ्यांचे असे एकूण १६७ बंधाऱ्यांचे ५०९८ लोखंडी दरवाजे उपलब्ध नाहीत. या एकूण उपलब्ध नसलेल्या ५०९८ दरवाज्यांपैकी २२५ दरवाजे चोरीस गेल्याबाबत स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. १७ कोल्हापूरी बंधाऱ्यांचे ७१८ लोखंडी दरवाजे गहाळ झालेबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यात आली आहे. गुन्हा अद्याप दाखल नाही. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करणेबाबत विभागामार्फत पाठपुरावा चालू आहे.

(२) व (३) गुन्हा नोंद करण्यात आलेले २२५ व तक्रार दाखल करण्यात आलेले ७१८ अशा एकूण ९४३ चोरीस गेलेल्या दरवाज्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमार्फत तपास सुरू आहे.

महाराष्ट्र जलासंधारण महामंडळाकडे आर्थिक मापदंड सुधारण्याबाबत हजारो प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(३९) ४८७०० (११-०३-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जलासंधारण महामंडळाकडे आर्थिक मापदंड सुधारण्याबाबत हजारो प्रस्ताव प्रलंबित असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोल्हापूर जिल्ह्यातील जलसंधारण कामांच्या आढावा बैठकीप्रसंगी पालकमंत्री यांनी अनेक समस्यांबाबत अधिकाऱ्यांशी विचारणा केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक मापदंड सुधारण्यासाठी शासन स्तरावर कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे

(२) होय, पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा यांनी दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजीच्या जिल्हाधिकारी कार्यालयामधील आढावा बैठकीत अनेक समस्यांबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे.

(३) ० ते २५० हेक्टर पर्यंतचे योजनांचे मापदंड सुधारित करणेबाबतच्या प्रस्तावावर जलसंपदा विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असून सद्यस्थितीत प्रस्ताव वित्त विभागाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) अनेक अंगणवाड्यात बालकांना पूरक पोषण आहार पुरविण्याबाबत

(४०) ४८८३८ (०३-०३-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) अनेक अंगणवाड्यात माहे नोव्हेंबर, २०१५ पासून बालकांना पूरक पोषण आहारच दिला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच या अंगणवाड्यात तातडीने पूरक पोषण आहार पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी बाल विकास प्रकल्प अधिकारी, ईगतदुरी यांनी तसेच जिल्हास्तरावरून चौकशी केली, चौकशी दरम्यान ईगतपुरी तालुक्यातील मौजे बलाईपुरी येथील दोन अंगणवाडी केंद्रांना दि.१८/१२/२०१५ ते ०९/०१/२०१६ पर्यंत बचत गटाने आहर पुरवठा बंद केला होता. मात्र या कालावधीत अंगणवाडी सेविका यांनी पर्यायी व्यवस्था म्हणून पुरक पोषण आहारात पोहे, शिरा, बिस्किट, लाडू इ. प्रकारचा आहार पुरवठा केलेला आहे. सदर अंगणवाडीला आहाराचा पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटाच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना समज दिल्यानंतर महिला बचत गटाने दि.११ /०१/२०१६ पासून सुरळीतपणे पुरक पोषण आहार पुरवठा सुरू केलेला आहे. सदर प्रकरणी संबंधित अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांना नोटीस बजावून सक्त ताकीदही देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रिसोड (जि.वाशिम) शहरालगत असलेल्या वनउद्यानाची अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाल्याबाबत

(४१) ४९७९८ (०७-०५-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) शहरालगत असलेल्या वनउद्यानाची अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या संदर्भात चौकशी करुन सदर वनउद्यानाची दुरवस्था दूर करुन त्याचे सौदर्यीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) सदरहू वन उद्यानामध्ये सौंदर्यीकरण करण्याचे दृष्टीने विकासात्मक कामे करण्यात आली आहेत. यामध्ये प्रवेशद्वार, पर्यटकांसाठी स्वागत कक्ष, भ्रमंती करीता मुख्य रस्ता, पाऊल वाट, पेव्हींग ब्लॉक रस्ते, छोटे पूल व ठिकठिकाणी सौर उर्जेवरील पथदिवे तसेच विसाव्याकरीता पॅगोडे बांधण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे वन्यपशूपक्षाकरीता बारमाही पाणी उपलब्ध व्हावे म्हणून मातीचा बंधारा, पर्यटकांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून कुपनलिका,पाणी साठविण्यासाठी सिमेंटची टाकी बांधण्यात आली आहे.

वरील सर्व कामे करण्यात आली असल्यामुळे उद्यानामध्ये पर्यटक तसेच लहान मुले भ्रमंती करता येत असून आनंद व्यक्त करत आहेत. त्यामुळे उद्यानाची दुरावस्था झाली म्हणणे योग्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथे अंगणवाडी लाभार्थ्यांना गरम व ताजा आहार पुरविण्याच्या कंत्राटाबाबत

(४२) ५०२४८ (११-०३-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे अंगणवाडी लाभार्थ्यांना गरम व ताजा आहार पुरविण्याचे कंत्राट संपत आलेले असतांना शासन (फ्री पॅकेज फूड) या नव्या पध्दतीने निविदा काढण्याबाबत विचारधीन असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पध्दतीमुळे मुंबई शहर आणि उपनगरातील बचतगट, महिला मंडळे व महिला संस्था यांचे खच्चीकरण होणार असल्याचे यांस अंगणवाडी आहार पुरवठाधारक संघटनेने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने फ्री पॅकेज फूडला मान्यता न देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे (२८-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) यासंदर्भात अंगणवाडी पुरक पोषण आहार पुरवठा धारक महिला संघटना, मुंबई यांनी दिनांक २०/०१/२०१६ च्या पत्रान्वये शासनास निवेदन दिलेले आहे.
(३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडीतील ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना अंगणवाडीत खाऊ घालण्यासाठी प्रिमिक्स स्वरूपातील पाककृती

पुरविण्यास मान्यता देण्याबाबत आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दि.०६/०१/२०१६ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावाची छाननी करून त्याअनुषंगाने काही मुद्दे उपस्थित करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत शासनपत्र दि.२९/०१/२०१६ अन्वये आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना कळविले आहे.

नाशिक जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियांनांतर्गत कामांबाबत

(४३) ५०२८० (२९-०४-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियांनांतर्गत किती कामे चालू आहेत,

(२) असल्यास, त्यापैकी किती अपूर्ण आहेत,

(३) असल्यास, या जलयुक्त शिवारावर ३१ जानेवारी, २०१६ पर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, जलयुक्त शिवारावर शासनाकडून माहे जानेवारी, २०१६ अखेर किती निधी मिळाला आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-६-२०१६) :(१) दि. १२ मे, २०१६ अखेर नाशिक जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत एकूण ५८०२ कामे सुरु आहेत.

(२) एकूण ५८०२ कामांपैकी ४९११ कामे पूर्ण करण्यात आली असून ८११ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) दि ३१ जानेवारी, २०१६ अखेल जलयुक्त शिवार अभियानावर रु. ७८.११ कोटी व दि. १२ मे, २०१६ अखरे रु. १२४.११ कोटी खर्च करण्यात आला आहे.

(४) जानेवारी, २०१६ अखेर शासनाकडून नियमित निधी व्यतिरिक्त जलयुक्त शिवार अंमलबजावणीसाठी रु. ६१.०९ कोटी विशेष निधी वितरित करण्यात आला आहे.

मराठवाडा विभागात जलयुक्त शिवार योजनेतर्गत कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४४) ५०३१८ (०३-०३-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत आतापर्यंत ३८.१८४ कामे पूर्ण झाली आहेत तर १९.८१८ कामे प्रगतीपथावर आहेत ही प्रगतीपथावरील कामे पुर्ण करण्यासाठी आयुक्तालयाकडून १७०० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी यासाठी सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन प्रगतीपथावरील कामे पुर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

मराठवाडा विभागात फेब्रुवारी अखेर एकूण ६७३३३ कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी ४२५७२ कामे पूर्ण झाली असून २४७६१ कामे प्रगतिपथावर आहे. आयुक्तालयाने रू १५७७.०७ कोटी निधीची माहिती सादर केली होती.

(२) जलयुक्त शिवार अभियानाचा मध्यवधी आढावा घेवून औरंगाबाद विभागास रू. १५७७.०७ कोटी निधी आवश्यक असल्याची माहिती शासनास सादर केली होती. त्यानुषंगाने रू.३४१.०८ कोटी निधी औरंगाबाद विभागास उपलब्ध करून देण्याचे मान्य केले असून मार्च अखेर खर्च करण्यासाठी रू.२०४.६५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील ७०% वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४५) ५१४७४ (०८-०३-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ७०% वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यामध्ये पदव्युत्तर पदवी व पदवीधारक वैद्यकीय अधिकारी मिळत नसल्याने जिल्ह्यातील आरोग्य सेवा पूर्णपणे विस्कळीत झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत अनेकदा शासनाकडे जिल्ह्यातील वैद्यकीय सेवा सुरळीत करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यासाठी खास बाब म्हणून एम.बी.बी.एस धारक डॉक्टरांना नियुक्ती व पदभरतीसाठी मान्यता देण्याबाबत पत्र व्यवहार झालेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (२२-३-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतन श्रेणी रू.१५६००-३९१००+६६००) संवर्गाची ३१ पदे मंजूर असून त्यापैकी १३ पदे भरलेली असून सदर १३ विशेषज्ञ आहेत.

वैद्यकीस अधिकारी गट-अ (वेतन श्रेणी रू.१५६००-३९१००+५४००) या संवर्गाची १५३ पदे मंजूर असून १४० पदे भरलेली आहेत त्यापैकी ३३ वैद्यकीय अधिकारी विशेषज्ञ आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रूग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्य सेवा विस्कळीत नाही.

(३) होय.
(४) गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण रूग्णालये व उपजिल्हा रूग्णालयांमधील वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाच्या रिक्त पदांवर अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास परवानगी देण्यात आली असून त्यानूसार २२ एम.बी.बी.एस. अर्हताधारक आस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील रेल्वे अपघातांत जखमी होणऱ्या प्रवाशांना तातडीने नजिकच्या खासगी रुग्णालयात वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत

(४६) ५१५३१ (०५-०३-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रेल्वे अपघातांत जखमी होणऱ्या प्रवाशांना तातडीने नजिकच्या खासगी रुग्णालयात वैद्यकीय उपचार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने तातडीने योग्य ते निर्देश जारी करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान तत्पूर्वी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशान्वये मुंबईतील रेल्वे अपघातांत जखमी होणाऱ्या प्रवाशांना नजिकच्या खासगी रुग्णालयात वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (२१-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.
PIL ५०/२००८ Sameer zaveri v/s Union of India and Ors या कोर्ट केस मध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी माहे डिसेंबर, २०१५ रोजी मुंबईतील रेल्वे अपघातात जखमी होणाऱ्या प्रवाशांना तातडीने नाजिकच्या खाजगी रूग्णालयात वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात यावे असे निर्देष दिले आहेत.
(२) मुंबईतील रेल्वे अपघातात जखमी होणाऱ्या प्रवाशांना नजिकच्या खाजगी रूग्णालयात वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत १०८ क्रमांकाच्या एकूण ४६ अत्याधुनिक रूग्णवाहिका मुंबईतील रेल्वे स्थानकांवर उपलब्ध करून दिलेल्या आहेत. सदर रूग्णवाहिकांमार्फत आतापर्यंत ११९२९ एवढ्या रूग्णांना सेवा दिली असून त्यापैकी ९५८० रूग्णांना सरकारी रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहेत तसेच २३४९ रूग्णांना रूग्णांच्या सहमतीने खाजगी रूग्णालयात दाखल केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथे वन विभागाच्या वाहतूक व विपणन आगार परिसर वृक्ष लागवडीसाठी प्रबंधित करण्यात येऊनही या ठिकाणी वन विभागाचे अद्यापपर्यंत वृक्ष लागवड केली नसल्याबाबत

(४७) ५१७२५ (११-०३-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथे वन विभागाच्या वाहतूक व विपणन आगार परिसर वृक्ष लागवडीसाठी प्रबंधित करण्यात येऊनही या ठिकाणी वन विभागाने अ द्यापपर्यंत वृक्ष लागवड केली नसल्याचे माहे, जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०३-२०१६) :(१) नाही

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

किडनी, हृदय (हार्ट) व यकृत निरुपयोगी झालेल्या रुग्णांना प्रत्यारोपण करण्यास मुंबईतील खाजगी रुग्णालयांनी शासनाकडे मागीतलेल्या परवानगीबाबत

(४८) ५२२२९ (०४-०३-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किडनी, हृदय (हार्ट), यकृत निरुपयोगी झालेल्या रुग्णांच्या शरीरात जनतेने दिलेल्या किडनी हृदय (हार्ट) यकृत आदि दान केलेले वरील महत्वाच्या अवयवांचे रोपण करुन बसविण्याची परवानगी मुंबईतील काही रुग्णालयांनी शासनाकडे मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती रुग्णालयांनी अशी परवानगी मागीतलेली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त अवयव बसविण्यासाठी परवानगी देण्यापूर्वी राज्य शासनाने नेमलेल्या तज्ञ समितींच्या पाहणी नंतरच परवानगी दिली जाणार आहे काय,

(४) असल्यास, शासकीय रुग्णालयांमध्ये उपरोक्त अवयव बसविण्याची यंत्रणा कार्यान्वीत आहे काय, नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (२१-०३-२०१६) :(१) होय

(२) मुंबईतील एकुण ५० रूग्णालयांनी परवानगी मागितली आहे.

(३) होय. अवयव प्रत्यारोपणासाठी रूग्णालयांना नोंदणी करण्यापुर्वी रूग्णालयाची तपासणी पथकामार्फत केली जाते. सदर तपासणी पथकाने सादर केलेल्या अहवालानूसार रूग्णालयास परवानगी दिली जाते.
(४) होय.

घनसावंगी तालुक्यातील (जि.जालना) अंगणवाडीत पोषण व पूरक आहाराचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत

(४९) ५२५७० (११-०३-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बालकांच्या आरोग्यासाठी सुदृढ बनविण्यासाठी अंडी व केळी देणे बंधनकारक असतांनाही घनसावंगी तालुक्यातील (जि.जालना) अंगणवाडीत पोषण व पूरक आहाराचा दर्जा निकृष्ट असल्याच्या तक्रारी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अंगणवाडीतील खेळाचे साहित्यही गायब झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२८-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात सन २०१५-१६ वित्तीय वर्षात शासन राबवित असलेल्या महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजनेची कामेच झाली नसल्याबाबत

(५०) ५३००७ (११-०३-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात सन. २०१५-१६ वित्तीय वर्षात शासन राबवित असलेल्या महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजनेची कामेच झाली नाहीत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी वरिष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी कामाचे नियोजन करण्यासंबंधी बैठका घेण्यात येऊनही वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशांचे पालन न करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संबंधितांवर कोणती कार्यवाही केली गेली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२८-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

सन २०१५-२०१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मुखेड तालुक्यात २२ गावांची निवड तालुकास्तरीय समितीने केली असून त्यास जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिली आहे.

सदर आराखड्यामध्ये ८ यंत्रणेची एकुण ११७६ कामे प्रस्तावित केली होती. त्यापैकी २७२ कामे पुर्ण करण्यात आली असून १८१ कामे प्रगतीपथावर आहेत. निवडलेल्या सदर गावांमध्ये अद्याप कामे सुरू आहेत.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.